महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत घेण्यात येणा-या सिंचन विहीरीची कामे पूर्ण करण्यासाठी विशेष मोहीम.

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक मग्रारो-२०१४/प्र.क्र.०९/मग्रारो-१
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१४

वाचा : १) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.२/रोहयो-१०अ, दिनांक १३ ऑक्टोबर, २०११.
२) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३० /रोहयो-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१२
३) नियोजन विभाग (रोहयो प्रभाग), शासन पत्र क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.०३/ रोहयो-१०अ, दिनांक ४ डिसेंबर, २०१३.

परिपत्रक

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक सिंचन विहीरींची कामे घेणे अनुज्ञेय असून संदर्भाधीन क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.३०/रोहयो-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१२ च्या शासन निर्णय अन्वये विहीरीच्या कामासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तद्नुसार ग्रामपंचायतीमार्फत या योजनेची अंमलबजावणी केली जाते. या योजनेसाठी मोठया प्रमाणावर मागणी असून, जवळजवळ १ लाख सिंचन विहीरीची कामे सुरु असून त्यापैकी फक्त ३०,००० विहीरी पूर्ण झाल्या आहेत व ७०,००० विहीरी अद्यापही अपूर्ण आहेत. संदर्भाधीन शासन पत्र मग्रारोहयो-२०१३/प्र.क्र.३/रोहयो-१०अ, दिनांक ४ डिसेंबर, २०१३ अन्वये दिलेल्या पाच कलमी कृती कार्यक्रमात प्रत्येक जिल्हयात घेण्यात आलेल्या विहीरींची जास्तीत जास्त कामे पुर्ण करणेबाबतच्या सूचना देवून किमान ५० टक्के विहिरींची कामे दिनांक ३१ मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण करुन घेण्याबाबत सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. तथापि, विहिरीची कामे अपूर्ण असल्याचे व अंमलबजावणी मध्ये अडचणी असल्याबाबत अनेक तक्रारी विहीर लाभार्थी व लोकप्रतीनिंधीकडून प्राप्त होत आहेत. त्यामुळे लाभार्थींशी थेट संपर्क साधून त्यांच्या अडचणींचे निराकरण करून योजनेच्या अंमलबजावणीला गती देणे आवश्यक आहे. त्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबविणेबाबत निर्णय घेतला असून त्यासंदर्भात खालील निर्देश देण्यात येत आहेत.

१. सदर मोहीम दिनांक **१० फेब्रुवारी,२०१४** ते दिनांक **१० मार्च,२०१४** या एक महिन्याच्या कालावधीत राबविण्यात यावी.

२. सिंचन विहिर कामाच्या बाबतीत अंमलबाजवणी यंत्रणा ग्राम पंचायत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने अंमलबजावणीत सक्रीय सहभाग घेणे अपेक्षीत असून साहित्याची खरेदी व पुरवठा देखील ग्राम पंचायत यंत्रणेमार्फतच होणे आवश्यक आहे. यासाठी शासन निर्णय दिनांक १३ ऑक्टोबर, २०११ अन्वये २५ टक्के निधी अग्रीम स्वरूपात वितरित करण्याचीही तरतूद आहे. मोहीम कालावधीत ग्राम पंचायतीने खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

अ) ग्रामपंचायतीने **१० फेब्रुवारी ते १४ फेब्रुवारी** या कालावधीत ग्राम पंचायतीची विशेष बैठक आयोजीत करावी. सर्व नरेगा विहिर लाभार्थींना या बैठकीसाठी निंमत्रीत करावे. ग्राम पंचायत बैठकीत चर्चे अंती प्रपत्र १ मधील नमुन्यात भाग १ व भाग ३ सरपंच,ग्राम सेवक व लाभार्थी यांच्या स्वाक्षरीने भरण्यात यावा. (प्रपत्र १ च्या मुरेशा प्रतींची छपाई गटविकास अधिकारी स्तरावरून करून सर्व ग्राम पंचायतीना पुरिवण्यात यावी). भाग ३ मध्ये विहिरीचे भुगतान प्रलंबीत असल्याची बाब निदर्शनास आल्यास मोहिम कालावधीत विहिरीचे मोजमाप घेण्यात येईल हे लाभार्थीला ग्राम पंचायतीने कळवावे.

ब) प्रत्येक लाभार्थ्यांसाठी प्रपत्र १ भरून सर्व अहवाल **१५ फेब्रुवारी पर्यंत** गटविकास अधिकारी कार्यालयात जमा करावे. याची जबाबदारी ग्राम सेवक यांची राहील.

३. **१९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी** या कालावधीत गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती ३-४ ठिकाणी (शक्यतो मंडळ मुख्यालय) लाभार्थींची बैठक आयोजीत करावी. या बैठकीत संबंधित ग्राम पंचायतीचे सरपंच व ग्राम सेवक यांना निमंत्रित करावे. या बैठकीत गटविकास अधिकारी यांनी ग्राम पंचायतींने भरून दिलेल्या प्रपत्र-१ च्या आधारावर आढावा घ्यावा व लाभार्थ्यांना तसेच ग्राम पंचायतीला मार्गदर्शन करावे. मजूरी किंवा कुशल भुगतानाबाबत काही तक्रारी असतील तर गटविकास अधिकारी यांनी त्वरीत सोडवाव्यात. या बैठकीसाठी गटविकास अधिकारी हे त्यांच्या कार्यालयातील इतर जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांची मदत घेवू शकतात (अतिरिक्त गटविकास अधिकारी/विस्तार अधिकारी पंचायत/ कृषि अधिकारी). या बैठकीनंतर गटविकास अधिकारी प्रपत्र-१ मधील भाग-४ भरावा.

४. ग्रामपंचायत स्तरावरुन प्रपत्र-१ भरुन ते पंचायत समिती स्तरावर प्राप्त झाल्यावर विस्तार अधिकारी पंचायत व तांत्रीक अधिकारी (पंचायत समिती) यांनी अहवालाची छाननी करावी. ज्या अहवालामध्ये भाग ३ नुसार भुगतान प्रलंबित असल्याचे दिसून येते त्या सर्व विहिरींवर तांत्रीक अधिकारी (कंत्राटी) यांनी **१९ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी** पर्यंत भेटी देवून त्यांचे मुल्यांकन करावे. पंचायत समिती स्तरावर प्राप्त झाल्यानंतर व त्याची छानणी झाल्यानंतर मुद्दा क्रमांक 3 व 4 मधील कार्यवाही एकाच वेळेला (in parallel) चालु शकतात.

५. मुल्यांकन अहवाल प्राप्त झाल्यावर गटविकास अधिकारी यांनी तपासणी करून व सर्व नियमांचे पालन झाल्याची खात्री करुन (उदा. अकुशल : कुशलचे ६०:४० गुणोत्तर) त्वरीत प्रलंबीत भुगतान करावे. सदर कार्यवाही दिनांक **१० मार्च, २०१४** पूर्वी पूर्ण करावी. तसेच ग्राम पंचायतीने कुशल खर्चासाठी 25% अग्रीमाची मागणी केल्यास, अग्रीम निधी वितरीत करण्यात यावा व हिशोब ठेवावा.

६. प्रत्येक तालुक्यात मोहीम कालावधीसाठी आवश्यकते नुसार 1 किंवा 2 वाहने भाड्याने घेता येईल. त्याचे प्रदान 6% प्रशासकीय निधीतून जिल्हाधिकारी कार्यालयाने करावे. वाहन भाड्याने लावण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी द्यावे.

७. तांत्रिक अधिका-यांनी क्षेत्रीय भेटीनंतर प्रपत्र-१ मध्ये भाग-२ भरावे. सर्व अहवाल (प्रपत्र-१) भरल्यानंतर गटविकास अधिकारी यांनी **दिनांक १५ मार्च, २०१४** पूर्वी जिल्हा परिषदेकडे सादर करावे (गोषवारा प्रपत्र २) याचे संकलन गटविकास अधिकारी (नरेगा) व कृषि अधिकारी (नरेगा) यांनी करावे.

८. मोहीमेचा एकत्रित अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांनी प्रपत्र-३ मध्ये आयुक्त, नरेगा मार्फत शासनाला सादर करावा.

९. उपरोक्त प्रमाणे मोहिम विहित कालावधीत राबवून यामधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या मोहीमेच्या संनियत्राची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

5/2/14

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो) महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपालांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिवांचे स्वीय सहायक
अतिरिक्त मुख्य सचिव
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई - ४००३२
आयुक्त, आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, नागपूर
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य , पुणे
सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२ (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
सर्व उपसचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी नियोजन विभाग (रोहयो)
सारसंग्रह रोहयो-१/ निवडनस्ती (रोहयो.१)

प्रपत्र-१

महात्मा गांधी नरेगा अंतर्गत सिंचन विहीरीचे कामे — माहिती तक्ता.

भाग-१

(सरपंच व ग्रामसेवक यांनी भरावे)

१. ग्रामपंचायतीचे नाव :

२. सिंचन विहीर लाभार्थ्यांचे नाव :

३. लाभार्थीचा जॉबकॉर्ड क्रमांक :

४. लाभार्थीची वर्गवारी (अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/दारीद्रय रेषेखालील/अल्प व अत्यल्प भुधारक शेतकरी)

५. लाभार्थीची निवड कोणत्या ग्रामसभा ठरावाने झाली (तारीख नमूद करा)

६. कुशल कामासाठी ग्रामपंचायतीला पंचायत समितीकडून काही अग्रीम मिळाला आहे का ?

७. ग्रामपंचायत क्षेत्रात महात्मा गांधी नरेगा अंतर्गत घेतलेल्या सिंचन विहिरींचा तपशिल

(अ) पूर्ण झालेली कामे -

(भौतिक व आर्थीक दृष्टया पूर्ण MIS वर अपूर्ण असल्यास देखील पूर्ण मध्ये नमूद करावे.)

(ब) प्रगतीपथावरील कामे.

दिनांक -

ग्रामसेवकाची सही **सरपंचाची सही**

भाग-२

(महात्मा गांधी नरेगा अंतर्गत तांत्रिक अधिकारी (कंत्राटी) यांनी भरावे)

१. कामाचा MIS वरील संकेतांक (WORK CODE) :

२. तांत्रिक मान्यतेचा तपशिल :

(दिनांक व ज्या अधिका-याने तांत्रिक मान्यता दिली त्यांचे पदनाम)

३. प्रशासकीय मान्यतेची दिनांक :

४. काम सुरु झाल्याची दिनांक (प्रथम हजेरीपटाचा दिनांक) :

५. अंदाजपत्रकीय बाबी व खर्चाचा तपशिल.-

	अकुशल	**कुशल**	**एकूण**
अंदाजपत्रकीय तरतुद			
प्रत्यक्ष खर्च (३१.१.२०१४ पर्यत)			
शिल्लक			

७.विहिरीचे शेवटचे मोजमाप केल्याचा दिनांक :

६. विहिर कधी पूर्ण होईल? पूर्ण करण्यामध्ये काही अडचणी आहेत का? असल्यास तपशिल नमूद करावा.

दिनांक :

तांत्रिक अधिकारी (कंत्राटी) यांची स्वाक्षरी

भाग-३

(सरपंच व लाभार्थी यांनी भरावे)

१ .लाभार्थींच्या मतानुसार,विहीरींची काही देयके प्रलंबित आहे का ? :

२. असल्यास, किती रकमेची देयके प्रलंबित आहेत :

(अकुशल व कुशल यांची विगतवारी दयावी (अंदाजे)

३. सिंचन विहीर कामात ग्रामपंचायत अंमलबजावणी यंत्रणा (Agency) आहे, ही बाब लाभार्थीला माहिती आहे का ? :

दिनांक :

लाभार्थींची स्वाक्षरी **सरपंचाची स्वाक्षरी**

भाग-४

(गटविकास अधिकारी यांनी भरावे)

१.आढावा घेतल्यानंतर, विहीरीचे काम सुरळीत सुरु आहे का? नसल्यास काय कारणे आहेत ? :

२. विहीरीचे काम ४ मे २०१२ पूर्वी सुरु झाले असल्यास (प्रथम मस्टरची तारीख ४ मे २०१२ पूर्वीचे असल्यास अकुशल : कुशलचे ६०:४० गुणोत्तर तालूका स्तरावर ठेवता येईल, हे गटविकास अधिकारी यांना माहिती आहे का ? त्यानुसार कार्यवाही होत आहे का ? :

३. आपल्या तालूक्यात अकुशल : कुशलचे ६०:४० गुणोत्तर किती, (अहवाल भरण्याच्या तारखेला) :

४. अकुशल : कुशलच्या ६०:४० गुणोत्तरमुळे विहीरीची देयके थांबली असल्यास, ग्रामपंचायतीने अकुशल काम घ्यावे याबाबत ग्रामपंचायतीला अवगत केले आहे का ? :

५. विहिर पूर्ण करण्यासाठी कोणती उपाययोजना आवश्यक आहे ? :

६. ग्रामपंचायतीला २५ टक्के अग्रीम (कुशल खर्चासाठी) दिले आहे का ? :

दिनांक :

गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी

प्रपत्र-२

तालूका ---------

ग्रामपंचायती चे नाव	अपूर्ण विहीरींची संख्या	त्यापैकी प्रप्रत्र-१ मधील भाग-३ अंतर्गत प्रलंबित भुगतान असलेल्या विहीरींची संख्या	रकाना-३ पैकी मोहीमेत मूल्यांकन झालेल्या विहीरींची संख्या	केलेले भुगतान		एकूण झालेला खर्च	अग्रीम दिले आहे का	मोहिम अंतर्गत पुर्ण केलेल्या विहिरींची संख्या
				कुशल	अकुशल		होय/नाही	
१	२	३	४	५	६	७	८	९

प्रपत्र-३

जिल्हा ---------

तालुक्याचे नाव	अपूर्ण विहीरींची संख्या	त्यापैकी प्रप्रत्र-१ मधील भाग-३ अंतर्गत प्रलंबित भुगतान असलेल्या विहीरींची संख्या	रकाना-३ पैकी मोहीमेत मूल्यांकन झालेल्या विहीरींची संख्या	केलेले भुगतान		एकूण झालेला खर्च	अग्रीम दिले आहे का	मोहिम अंतर्गत पुर्ण केलेल्या विहिरींची संख्या
				कुशल	अकुशल		होय/नाही	
१	२	३	४	५	७	७	८	९